# राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य

– डॉ.वैशाली विठ्ठल खेडकर

बहुजन समाज हा आपला, अंधारात आहे पडलेला ।
मूळ कारण घ्यावे ध्यानाला, अज्ञानीपणा हा भवला ।
तेव्हा शिक्षण पाहिजे सर्वांला, असे वाटून शाहू राजाला
प्राथमिक शिक्षणाचा त्यांनी पाया घातला ।।

छत्रपती शाहू महाराजांचा अभ्यास करताना अभ्यासकांसमोर अनेक प्रश्न उभे राहातात. महाराज दलितोद्धारक होते, समाजक्रांतिकारक होते, शिक्षणप्रेमी होते हे त्यांच्या चरित्रावरून सहज सिद्ध करता येते. डॉ. आंबेडकरांनी त्यांचा समाजक्रांतिकारक म्हणून गौरव केला व आज तर 'फुले–शाहू–आंबेडकर प्रेरणा' असा शब्द प्रयोग समतेची प्रेरणा या अर्थी रूढ झालेला आहे.

शाहू महाराजांनी समाजजीवनाचे बारकाईने निरीक्षण केले. आलेल्या अनुभवांचा उपयोग राजाने रयतेच्या हितासाठी केला. आपल्या राज्यात जनहिताचे अनेक कायदे केले. 'प्रजस्य सुखम्, सुखम राजा' प्रजेच्या सुखातच राजाचे सुख आहे, हे धोरण अमलात आणले. शिक्षणाशिवाय बहुजन समाजाला तरणोपाय नाही, हे महात्मा फुले यांनी जाणले होते. या धोरणाचा स्वीकार शाहू महाराजांनी केला. आपल्या प्रजेतील सर्व जाती–जमातीच्या लोकांना सरकारी नोकऱ्यांमध्ये योग्य ते प्रतिनिधित्व मिळावे यासाठी त्यांनी सर्व प्रजेमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्याच्या दृष्टिकोनातून पहिले पाऊल उचलले.

**प्राथमिक शिक्षण कायद्याची अंमलबजावणी :**

या योजनेअंतर्गत ५०० ते १००० लोकसंख्या असलेल्या प्रत्येक गावात प्राथमिक शाळा स्थापन करण्यात आली. वर्षभरात संस्थानांतील खेडयापाडयात अशा ९६ शाळा सुरू झाल्या. पहिल्या नव्या सक्तीच्या शाळेचा उद्घाटन सोहळा ८ मार्च १९१८ रोजी चिखली गावी खुद्द शाहू महाराजांच्या हस्ते संपन्न झाला.कोल्हापूरसारख्या लहानशा संस्थानाने प्राथमिक शिक्षणासारख्या बाबीवर दरवर्षी लाख रुपये खर्च करणे म्हणजे साधी बाब नव्हती. त्या काळी प्राथमिक शिक्षकाचा पगार १२ रुपये होता. त्यामानाने ही रक्कम प्रचंड होती. त्या सुमारास महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात व

सिंध इतक्या अफाट प्रदेशावर पसरलेल्या मुंबई इलाख्याचीही शिक्षणातील तरतूद एक लाख रुपये नव्हती. या पार्श्वभूमीवर शाहू महाराज आपल्या संस्थानाच्या उत्पन्नातून एक लाख रुपये प्राथमिक शिक्षणासाठी खर्च करीत होते, ही गोष्ट हिंदुस्थानच्या इतिहासात अपूर्व मानली पाहिजे. महाराजांनी हा पैसा प्रत्येक घरावर एक रुपया नाममात्र शिक्षणकराच्या रूपाने उभा केला.

संस्थानातील मामलेदार-महालकरी या अधिकाऱ्यांपासून गावच्या पाटलापर्यंत सर्वांना या प्राथमिक शिक्षण चळवळीत सहभागी करून घेण्यात आले. जे लोक मुले शाळेत पाठवणार नाहीत त्यांना दंड करणे, दरमहा शाळा तपासणी करून त्याचा रिपोर्ट पाठवणे, इ. कामे त्यांच्यावर सोपवण्यात आली. यामागे महाराजांचा हेतू हाच होता की, प्राथमिक शाळांची योजना कागदोपत्री न राहता तिची अमलबजावणी पूर्ण कार्यक्षमतेने व्हावी. प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात शाहू महाराजांनी घेतलेले निर्णय सामाजिकदृष्ट्या महत्वाचे होते. त्यापैकी पहिल्या निर्णयानुसार संस्थानातील अस्पृश्यांसाठी अस्तित्वात असलेल्या शाळा बंद केल्या गेल्या. अस्पृश्यांची मुले आता स्पृश्यांच्या मुलांबरोबर शिकू लागली. दुसरा निर्णय शेतकऱ्यांच्या मुलासंबंधी होता. मुलांचा शेतीकामात हातभार लागत असल्याने शेतकरी मुलांना शाळेत पाठवत नसे. यावर उपाय म्हणून महाराजांनी शेतकऱ्यांच्या मुलांनी सकाळी किंवा संध्याकाळी दोन तास शाळेत यावे व बाकीचा वेळ शेतकामात घालवावा अशी सवलत दिली. यावरून प्राथमिक शिक्षणासंबंधीचे महाराजांचे धोरण किती लवचिक व वास्तववादी होते याची प्रचिती येते.

सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाच्या योजनेची अंमलबजावणी करीत असता गरीबांसाठी हायस्कूलचे मॅट्रिक्यूलेशनपर्यंतचे शिक्षण मोफत करण्याचा विचार शाहू महाराजांच्या मनामध्ये आला. २५ मार्च २०१८ रोजी प्रसिद्ध झालेल्या आदेशात महाराजांनी म्हटले आहे की, प्राथमिक शिक्षणाच्या योजनेवर खर्च करून राहिलेली रक्कम दुसऱ्या कोणत्याही बिगरशैक्षणिक बाबीवर खर्च करावयाची नसून, अशा प्रकारचे शिलकेचा विनियोग सवडीप्रमाणे मॅट्रिक्यूलेशन परीक्षेपर्यंत शिक्षण सर्व जातीचे गरीब विद्यार्थ्यांना मोफत देण्याकडे करण्यात येईल. महाराजांना जर आणखी काही वर्षे आयुष्य लाभले असते, तर त्यांनी हे माध्यमिक शिक्षणही सर्वांसाठी मोफत करून ठेवले असते. १९१७-१८ सालात सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना कार्यान्वित झाली, त्यावेळी या योजनेखाली २७ शाळा व १२९६ मुले होती. पाच वर्षांच्या कालावधीत १९२१-२२ सालापर्यंत त्यात वाढ होऊन शाळांची संख्या ४२० व मुलांची संख्या २२००७ अशी झाली. १९२२ सालापर्यंत या योजनेवर होणारा खर्च तीन लाखांपर्यंत गेला होता.

शाहू महाराजांच्या शैक्षणिक धोरणाचे परिणाम केवळ कोल्हापूर संस्थान व

त्यांची कारकीर्द यापुरतेच मर्यादित राहिले नाही. त्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन पुढे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यापासून ते डॉ. पंजाबराव देशमुखांपर्यंत अनेक शिक्षण प्रसारकांनी सर्व महाराष्ट्रात बहुजन समाजाला समर्थ बनविणारी शिक्षण चळवळ अर्ध शतकभर चालविली. शेकडो प्राथमिक शाळा, हायस्कूल आणि कॉलेज स्थापन करून ज्ञानगंगेचे असंख्य पाट त्यांनी रयतेच्या झोपडीपर्यंत पोहोचविले. परिणामी महाराष्ट्रात बहुजन समाजाचा एक अपूर्व सामाजिक अभ्युदय घडून आला; परंतु राजर्षींनी पाहिलेले स्वप्न आजही अपूर्ण राहिलेले आहे. आज शिक्षणप्रक्रिया वेगळ्याच दिशेने भरकटलेली दिसून येते. शिक्षण हे गरीबांचे राहिले नसून केवळ श्रीमंतांचीच मक्तेदारी झाली आहे. दुर्दैवाने आज जगात ज्ञान वाढत आहे, पण शहाणपणा वाढलेला दिसत नाही. आज शिक्षणाचा बाजार मांडला आहे. पुढाऱ्यांना शाळा उघडण्याचे परवाने द्यायचे आणि त्या परवान्याच्या भरवशावर या पुढाऱ्यांनी शिक्षणाच्या खरेदी-विक्री संस्था गल्लीबोळात उघडून पाहाता-पाहाता धनवान व्हायचे अशा शिक्षण संस्थेतून मुले काय शिक्षण घेणार?

आजची शिक्षणपद्धती परीक्षाभिमुख आहे, कारण परीक्षा घेणे म्हणजे विद्यार्थ्याला पारखून घेणे. परीक्षा या शब्दाचा इंग्रजीतील समान अर्थी शब्द Examination असून त्याची व्युत्पत्ती लेटीनमधील Examin या शब्दावरून झाली आहे. Examin या शब्दाचा अर्थ आहे 'तराजू काटा'. यावरून स्पष्ट होईल की, परीक्षक उमेदवाराचे ज्ञान काटयाला लावून पाहातो. कमीत कमी अपेक्षित वजनाशी किंवा गुणांशी जेव्हा काटा समपातळीत दाखवितो तेव्हा विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याचे जाहीर केले जाते पण हे काटेच विश्वसनीय, वस्तुनिष्ठ आहेत का? हेही तपासणे आवश्यक आहे. तरुणांनी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनावे म्हणून शाहूमहाराजांनी शिक्षणाबरोबर धंदेशिक्षणाची सोय केली होती. त्यामुळे होतकरू व गरजू विद्यार्थ्यांना समर्थ जीवन जगण्यास मदत झाली; परंतु आजच्या शिक्षण पद्धतीत केवळ परीक्षेत यश मिळविण्यासाठी अध्ययन-अध्यापन केले जाते केवळ परीक्षेत यशस्वी होण्यासाठी विद्यार्थी तयार करणे इतकेच संकुचित उद्दिष्ट आजच्या शिक्षणाचे अंतिम ईप्सित होऊन बसले आहे. आजच्या शिक्षण पद्धतीने मुलांना ऐशोरामी बनविले आहे. सहा-सात विषयांची घोकंपट्टी करून अगदी नि:शंकपणे मुले पास होतात. मग कोण वर्षभर अभ्यास करून नोट्स काढण्याचा त्रास घेतो ? एखाद्या विद्यार्थ्याचे वडील हे जर पुढारी, नेता किंवा पैसेवाले असतील, तर परीक्षकाचे लक्ष त्या विद्यार्थ्याकडे असते. कारण त्या श्रीमंत बापाने परीक्षकाकडे 'माझ्या मुलाकडे लक्ष द्या' हे सांगण्यासाठी छप्पन फेऱ्या घातलेल्या असतात. त्यामुळेच आज शिक्षणक्षेत्रातील ही परीक्षा संस्कृती पाहून असे वाटते की, आज आपण पदवीधर जबाबदार नागरिक तयार

करत आहोत की पोपटपंची करणारे पोपट तयार करीत आहोत, हा प्रश्नच आहे. शिक्षणाच्या मूळ उद्देशाचा सर्वांना विसर पडलेला आहे.

आज शैक्षणिक क्षेत्रात परीक्षांचा वापर संख्यात्मक गुण देऊन विद्यार्थ्यांचे नंबर लावण्यासाठी, त्यांना वरच्या वर्गात घालण्यासाठी अगर प्रमाणपत्र देण्यासाठी केला जातो. आजची शिक्षणपद्धती ही अत्यंत सदोष असून, शैक्षणिक प्रगतीवर तिचा विकृत परिणाम होत आहे. अध्ययन-अध्यापन यात जिवंतपणा उरलेला नाही, अशी टीका युनिव्हर्सिटी एज्युकेशन कमिशनने आपल्या अहवालात केली आहे. परीक्षा देऊन पास होणे व प्रशस्तिपत्रक मिळविणे हे शिक्षणाचे अंतिम ध्येय आहे, असेच वाटते. Education is a process of bringing about clearable changes असे असूनही आजच्या विद्यार्थ्यास पाढे म्हणता येतात; पण वाण्याने केलेला हिशोब चूक की बरोबर हे ठरविता येत नाही. आजच्या परीक्षेत ९०% गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यास भारतातील विविध शहरांची, बंदराची यादी पाठ असते; परंतु, नकाशावर ती काढता येत नाही. नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांची नावे पाठ परंतु अडचण आली तर कोणाकडे जावे हे समजत नाही, अशी आजची शिक्षणपद्धती कुचकामी आहे. यावर एकमात्र उपाय म्हणजे शिक्षणपद्धतीत अमूलाग्र बदल करणे. इंग्रजांनी सुरू केलेल्या या कारकुनी शिक्षण पद्धतीचा आता तरी अस्त व्हायला हवा.

आजच्या युगात व्यावसायिक शिक्षण घ्यायला हवे. जीवनातील संकटांना धैर्याने तोंड देण्याचे सामर्थ्य विद्यार्थ्यात मूल्यशिक्षणाद्वारे निर्माण करायला हवे. त्यासाठी महात्मा फुले, राजर्षी शाहू, आंबेडकर यांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेणे आवश्यक आहे. महर्षी कर्वे, महात्मा ज्योतिबा फुले,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बरोबरीनेच आज राजर्षी शाहू महाराजांचे नाव घेतले जाते. कारण शिक्षणाचे महत्व या राजाने मागासलेल्या काळात म्हणजे ११० वर्षांपूर्वीच जाणले होते. गाद्यागिरद्यावर लोळून आयुष्य घालवणे या राजाला सहज शक्य होते; परंतु अज्ञानी जनतेला सज्ञान करण्याचा विडाच जणू या थोर राजाने उचलला होता. अंधश्रद्धा, मागासलेपणा शिक्षणाशिवाय दूर होणार नाही हे शाहू महाराजांनी जाणले होते. आपले अल्पआयुष्य राजर्षी शाहू महाराजांनी समाजसुधारणेच्या कामी लावले.

अशा या थोर राजाला अवघे ४८ वर्षे आयुष्य लाभले. ६ मे १९२२ रोजी मुंबईतील खेतवाडी बैंक रोडवर असलेल्या 'पन्हाळा लॉज' नावाच्या बंगल्यात सकाळी ६ वाजता शाहू महाराजांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. कोल्हापूर संस्थानाचा सूर्य अस्तास गेला. अशा इतिहास पुरुषाला आणि दलितांच्या, शोषितांच्या पाठीराख्याला शतशः नमन. अखंड मानवतेसाठी स्वत:ला वाहून घेतलेल्या या राजयोग्याच्या निर्मळ कीर्तीला प्रणाम !